# नियमित दिवाणी मुकदमा नं.२५८/२०१२ मधील निशाणी ३४ वरील आदेश

( CNR NO. MHRG14-000554-2012)

१. वादी याने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, वादी संचालक असलेली कंपनी 'गणेश इन्वेसमेंट ॲण्ड फायनान्सिअल टेक्नीक्स प्रा.लिमीटेड' चे नाव बदलण्यात आल्याने त्या मजकुरापूर्वी 'जी आय कार्पोरेट ॲडव्हाइजर्स प्रा. लि. पूर्वाश्रमीची' असा मजकूर नमूद करुन त्याप्रमाणे दावा दुरुस्ती मागितली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे देवून अर्ज मंजूर करणेस हरकत नसल्याचे कथन केले आहे.

४. वादीचा अर्ज, म्हणणे व अभिलेख वाचून पाहीला.

५. सदरचा दावा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने दाव्यामध्ये विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण –उरण (निलेश एम.वाली )

दिनांक – १२.१०.२०२१. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.